International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.082
Vol.3 No.6 July – Aug 2016

# चक्रेश्वरवाडी धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास

**डॉ. धनाजी आप्पासो चौगले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

**गोषवारा :**

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटनाचा विकास केल्यामुळे रोजगार निर्मिती होते व बेकारी कमी करण्यास मदत होते. कोल्हापूर जिल्ह्यातील चक्रेश्वरवाडी हे राधानगरी तालुक्यातील एक धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. या धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी येथे पायाभूत सुविधांचाविकास करणे गरजेचे आहे. या ठिकाणी खगोलप्रेमीया पर्यटन स्थळाला भेटी देतात. शिळा वर्तुळाचा विकास करून येतील गावास एक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करता येईल. त्याच बरोबर धार्मिक पर्यटन ठिकाणी एक यात्री निवास निर्माण केल्यास या पर्यटनस्थळाचा विकास होईल. येथे येणाऱ्या भाविकांसाठी पार्किंगची सुविधा, आरोग्य विषयक सुविधा, पाण्याचीसुविधा उपलब्ध करून दिल्यास येणाऱ्या काळात हे एक धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होईल.म्हणून्नचमी प्रस्तुत शोध निबंध साठीचक्रेश्वरवाडी धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास हा विषय निवडलेला आहे.

**प्रस्तावना:**

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. जगामध्ये ज्या ठिकाणी पर्यटन विकासास वाव आहे अशा ठिकाणी पर्यटनाचा विकास केला जात आहे. पर्यटनामुळे रोजगार निर्मिती होते व बेकारी कमी करण्यास मदत होते. पर्यटनामुळेचआंतरराष्ट्रीय संबंध सुधारण्यास मदत होते म्हणून पर्यटन हा जगभरात झपाट्याने विकसित होणारा आर्थिक व्यवसाय आहे. भारतामध्ये सुद्धा भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे. या विविधतेमुळे येत्या काळात भारत हा देश सुद्धा पर्यटनामध्ये अग्रेसर दिसेल. महाराष्ट्रामध्ये भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक विविधता असल्यामुळे पर्यटन विकासावर जास्तीत जास्त भर देण्यात येत आहे. एखाद्या प्रदेशातील पर्यटन स्थळाचा विकास केल्यास तेथे रोजगार

निर्मिती होऊन एक प्रकारे प्रादेशिक समतोल साधण्यास मदत होते. स्थानिक पातळीवर धार्मिक पर्यटन स्थळाचा विकास करणे गरजेचे आहे तेथील समस्यांचा अभ्यास करून भविष्यात त्या पर्यटनस्थळाचा विकास होऊ शकतो.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळाचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. भविष्यात याच पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास केल्यास कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळाचा विकास होऊन रोजगार निर्मिती होईल त्यामुळेच मी या प्रस्तुत शोध निबंधामध्ये चक्रेश्वरवाडी धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यासहा विषय निवडलेला आहे

**उद्दिष्टे:**

१. चक्रेश्वरवाडी येथील धार्मिकव ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.

2. चक्रेश्वरवाडी येथील धार्मिक व ऐतिहासिकपर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणाऱ्या समस्येचा अभ्यास करणे.

३. चक्रेश्वरवाडी येथील धार्मिक व ऐतिहासिकपर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**अभ्यास क्षेत्र:**

कोल्हापूर महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील शेवटचा जिल्हा आहे. चक्रेश्वरवाडी हे राधानगरी तालुक्यातील एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या गावाचे क्षेत्रफळ 324 चौरस किलोमीटर एवढे आहे चक्रेश्वरवाडी गावाचा अक्षवृत्तीय विस्तार 16°27'51"उत्तर अक्षवृत्त व आणि रेखावृत्तीय विस्तार 74°4'42"पूर्व रेखावृत्त आहे2011 च्या जनगणनेनुसार चक्रेश्वरवाडी गावाची लोकसंख्या १२९० इतकी आहे. चक्रेश्वरवाडी च्या उत्तरेस बारडवाडी, दक्षिणेस आकनूर, पूर्वेस जोगेवाडी व पश्चिमेस आणाजे ही गावे आहेत.

**माहिती संकलन व अभ्यास पद्धती:**

चक्रेश्वरवाडी येथील धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचा वापर केलेला आहे. प्राथमिक माहिती संकलन करीत असताना प्रश्नावली व मुलाखत या दोन पद्धतीचा उपयोग केलेला आहे तर दुय्यम माहिती संकलन करण्यासाठी वर्तमानपत्रे,पुस्तके, प्रकाशित साहित्य, जिल्हा जनगणना अहवाल, इंटरनेट इत्यादीचा वापर केलेला आहे. उपलब्ध माहितीच्या आधारे योग्य प्रकारे विश्लेषण केलेले आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला ३५किलोमीटर अंतरावर सह्याद्रीच्या एका डोंगर माथ्यावर चक्रेश्वरवाडी हे एक धार्मिक ठिकाण आहे. या गावाच्या आसपासचा प्रदेश पर्यटकासाठी व अभ्यासकांसाठी मोठा खजिना आहे या परिसराचे तीन भाग पडतात चक्रेश्वरवाडी, तपसा आणि शीलावर्तुळाचे शिखर

**महादेव मंदिर:**

चक्रेश्वरवाडी येथील चक्रेश्वरराचे म्हणजेच शंकराचे महत्त्व कोल्हापूरच्या अंबाबाई इतकेच प्राचीन आहे. करवीर क्षेत्राची प्रदक्षिणा करताना दक्षिण द्वाराच्या चक्रेश्वरराचे दर्शन घ्यावे असे उल्लेख सापडतात. मंदिरात पायऱ्या उतरून जावे लागते तेथील शिव पिंडावर मुख्य लिंग आहे मंदिराचे बांधकाम बाराव्या ते चौदाव्या शतकातील आहे पूर्वी या मंदिराला प्रति करवीर मानले जात असावे कारण या मंदिरात महालक्ष्मी, महाकाली व महासरस्वती च्या मूर्ती आहेत. महालक्ष्मीची मूर्ती हुबेहूब कोल्हापूरच्या मुर्तीप्रमाणे आहे.मंदिरात एक शिलालेख आहे. त्यावरील विक्रम सावंत १४२१म्हणजेच इ.स.१४९९ही अक्षरे स्पष्टपणे दिसतात. मंदिराच्या उजव्या बाजूच्याकोपऱ्यात भैरव स्वरूपातील एक मूर्ती आहे. त्याला लोक खोकलोण म्हणतात.चक्रेश्वरवाडी येथील हे मंदिर पुरातन आहे हे मंदिर जागृत देवस्थान म्हणून ही

प्रसिद्ध आहे. दरवर्षी महाशिवरात्री दिवशी येथे मोठी यात्रा भरते. प्रत्येक श्रावण सोमवारी शिवभक्तांची दर्शनासाठी मोठी रांग असते.

दरवर्षी येथे येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असलेले प्राथमिक अभ्यासातून दिसून आलेले आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांमध्ये जास्तीत जास्त भाविक कोल्हापूर जिल्ह्यातील असलेले दिसून आले आहेत. गेल्या वीस वर्षात या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढताना दिसून येते.

**तपसा:**

चक्रेश्वरवाडी पासून दोन-अडीच किलोमीटरवर तपसा परिसर आहे. येथे एक मोठे कुंड आहे. नैसर्गिक रित्या या कुंडाचे दोन भाग झाले आहेत. या कुंडाचे वैशिष्ट्य असे की त्याचा खडका अत्यंत कठीण आहे. पावसाचे पाणी यात साठते व बाष्पीभवनामुळे ते कमी होते. वर्षभर या कुंडात कमी-अधिक प्रमाणात पाणी असते. कुंडात उतरण्यासाठी एका बाजूस पायऱ्या आहेत हे कुंड प्राचीन काळातील असावे असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

**शिळावर्तुळाचे शिखर:**

चक्रेश्वरवाडी प्रवेश कमानीतून थोडे आत गेल्यावर डाव्या बाजूला एक टेकडी आहे. तेथे शिवलिंगाकार विहीर आहे. तिचे नाव गंगातीर्थ आहे. त्याच्या समोरच मोठा नंदी आहे. त्याचे तोंड टेकडीच्या शिखराच्या दिशेने आहे. त्याच्या जवळच पहिलाचक्राकितपाषण दिसतो. तेथून पुढे गेल्यावर एक शिवमंदिर आहे. या परिसरात शेकडो पाषाण आहेत प्रत्येक पाषाणावर काहीना काही कोरीव काम दिसते. तेथे उभा राहिल्यास विनाअडथळा आकाश गोल दिसते. ही जागा खगोल शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. म्हणूनच खगोलशास्त्र प्रेमी,शिळावर्तुळास भेटी देतात व त्याचे संशोधन केले जात आहे.

**चक्रेश्वरवाडी येथील धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणाऱ्या समस्या**

चक्रेश्वरवाडी या धार्मिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. या गावांमध्ये श्रावण महिन्यामध्ये लाखो भाविक भेट देतात. महाशिवरात्रीला या गावामध्ये हजारो भाविक दर्शनासाठी येतात यात्रा कालावधीत या गावात अनेक समस्या निर्माण होतात.चक्रेश्वरवाडी या धार्मिक पर्यटन स्थळांकडे येण्यासाठी एकेरी मार्ग असल्यामुळे वाहनांची गर्दी झालेली दिसून येते तसेच यात्रा कालावधीत पार्किंगची समस्या ही मोठ्या प्रमाणामध्ये दिसून आली. यात्रा कालावधीत या ठिकाणी अनेक

लहान मोठी दुकाने असतात त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येतेयेथे जागेचा अभाव दिसून येतो. मंदिराच्या आसपास केरकचरा व घनकचरा याची समस्या दिसून येते . या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी येण्यासाठी वाहतूक व्यवस्था कमी असलेले दिसून येते यात्रा कालावधीत याठिकाणी पार्किंग समस्या, आरोग्यविषयक समस्या, जागेची समस्या, केरकचऱ्याची समस्या व पाणीपुरवठ्याची समस्या दिसून येतात

**चक्रेश्वरवाडी येथील धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असलेल्या समस्येवरील उपाय योजना:**

चक्रेश्वरवाडी हे एक धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. याठिकाणी महाशिवरात्रीला लाखो भाविक भेट देतात. भाविकासाठी ज्या सुविधा पाहिजे त्या सुविधा त्या ठिकाणी नाहीत त्यासाठी उपाय योजना पुढील प्रमाणे

या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी यात्रा कालावधीत व दररोज जी पार्किंगची समस्या निर्माण होते ती सोडवण्यासाठी कायमस्वरूपी या गावातील गायरान जमिनीवर पार्किंगची व्यवस्था करावी तसेच या गावात येण्यासाठी जो एकेरी मार्ग आहे तो दुहेरी होण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकासाठी शौचालय व्यवस्था निर्माण केल्यास स्वच्छते विषयी प्रश्न सुटेल. यात्रा कालावधीत व इतर वेळी भाविकांसाठी आरोग्य विषयक सुविधा पुरवाव्यात यात्रा कालावधीत वेगवेगळी दुकाने या ठिकाणी असतात त्याचे नियोजन ग्रामपंचायतीने व्यवस्थित करावे तसेच मंदिराच्या आसपास जो केरकचरा पडलेला असतो त्या ठिकाणी कचरापेटी ठेवल्यास ही समस्या सोडवता येईल. या गावात ऐतिहासिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करण्यासाठीइतिहास प्रेमी व अवकाशाचा अभ्यास करण्यासाठी खगोलप्रेमी भेटी देतात. खगोल प्रेमी अनेक वेळा भेटी देतात ही संधी साधून या गावातील ग्रामपंचायतीने एक खगोल प्रयोगशाळा उभा करण्यास शासनाकडे पाठपुरावा करावा. तसेच याठिकाणी भविष्यात हे धार्मिक पर्यटन स्थळ विकसित होण्यासाठी राज्य शासनाकडे एक तीर्थक्षेत्र आराखडा मंजूर करून घ्यावा तसे झाल्यास या गावातील लोकांना रोजगार उपलब्ध होतील. त्याच बरोबर शासनास या पर्यटन स्थळ अ वर्ग दर्जा देण्यास पाठपुरावा करावा. यात्रा कालावधीत व इतर वेळी येणाऱ्या भाविकासाठी गायरान जमिनीवरती एक भक्ती

निवास उभारावे या पर्यटनस्थळाचा विकास करण्यासाठी गावातील सर्व लोकांनी, लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन ऐक्याची भावना ठेवून या पर्यटनस्थळाचा विकास करावा.

**निष्कर्ष:**

चक्रेश्वरवाडी हे कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील एक प्रसिद्ध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पायाभूत सुविधाउपलब्ध करून दिल्यासभविष्यात हे एक चांगले पर्यटन स्थळ म्हणून विकसित होईल. येथील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. येथे धार्मिक पर्यटनाबरोबरच ऐतिहासिक पर्यटन स्थळ सुद्धा विकसित करण्याची एक संधी आहे. भविष्यात या ठिकाणी एक भक्ती निवास, खगोल प्रेमीसाठी खगोल प्रयोगशाळा, गायरान जमिनीवर एक पार्किंग व्यवस्था तसेच आरोग्य व स्वच्छतेविषयी लक्ष दिल्यास हे पर्यटन स्थळ महाराष्ट्रातील नवे तर भारतातील एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ होईल.

**संदर्भ:**


१. श्री करवीर महात्मा ग्रंथ: अध्याय ४३,पान क्रमांक ३०४व अध्याय ५६,पान क्रमांक ३४७

२. युगयुगीन करवीर इतिहास दर्शन: डॉ. गो.न. देगलूरकर,पान क्रमांक २५३ते २५४

३. दैनिक लोकमत, बुधवार ६जून २००७

४. दैनिक पुढारी, सोमवार १९ नोव्हेंबर २००७

५. दैनिक पुण्यनगरी, सोमवार,२३फेब्रुवारी २००९

६. दैनिक सकाळ, रविवार १ लै २०१०

७. पर्यटन भूगोल: प्रा.डॉ. एस. बी. शिंदे

८. जिल्हा जनगणना अहवाल २०११